म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ओवि. वा
दा. क. ५७७८

IRBK-0105776

ऐतिहासिक कथामाला : ६ :

# बाळाजी विश्वनाथाची कथा

★

संपादक :

श्री. विश्वेश्वर

किंमत आठ आणे

IRBK-0105776

IRBK-0105776

चित्रशाळा प्रकाशन, पुणे २.

॥ मुद्रक व प्रकाशक ॥
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक), चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

* * *

सुधारून लिहिलेली
नवी आवृत्ति
जानेवारी १९५६

* * *

सर्वाधिकार
प्रकाशकाधीन

★

★

: अनुक्रम :

१. थोडीशी ओळख - - ३
२. हरणावरून तंटा - - ५
३. पेशवाईचीं वस्त्रें - - ८
४. आंग्र्यांला वळविलें - - १२
५. थोरातास नमविलें - - १४
६. पुणें प्रांत ताब्यांत आणला - १७
७. सय्यदबंधूंपैकीं एक - - १९
८. बाळाजीची दिल्लीवर स्वारी - २२
९. दिल्लीची दंगल व बाळाजीची चंगळ २५
१०. धन्य बाळाजीपंत पेशवे - २९

अनुक्रम
विभाग
क्र.
नों. दि.



## थोडीशी ओळख

मुंबईच्या दक्षिणेस गेल्यावर बाणकोट खाडी लागते. त्या बाणकोट खाडीच्या उत्तर मुखावर हरेश्वर व श्रीवर्धन हीं गांवें आहेत. या गांवांवर हबशांचा अम्मल होता. हबशांना सिद्दी असेंहि म्हणतात. श्रीवर्धनच्या गांवची देशमुखी भट आडनांवाच्या ब्राह्मणाकडे होती. देशमुख म्हणजे कोण माहीत आहे का तुम्हांला? देशमुख म्हणजे गांवच्या ठरलेल्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा आपल्या मेहनतीबद्दल घेऊन उरलेलें उत्पन्न सरकारांत भरणारा वजनदार माणूस. श्रीवर्धनला विश्वनाथ भट हा देशमुख होता. या विश्वनाथ भटाचा मुलगा बाळाजी. या बाळाजीची हकीकत अशी :



छत्रपति राजाराम महाराज

बाळाजीचा जन्म इ. स. १६६० च्या सुमाराला झाला. बाळाजीला आणखी चार भाऊ होते, म्हणून बाळाजी घरीं राहिला नाहीं. मिठागराच्या कामावर नोकरीस लागला; पण सिद्दी अम्मलदाराचें

व त्याचें जमेना. सिद्दी ब्राह्मणांना त्रास देत. ब्राह्मणांना छळीत. मग बाळाजी आपलें नशीब काढण्याला देशावर आला. त्या वेळीं छत्रपति राजाराम महाराज गादीवर होते. बाळाजी अगोदर भोरास आला. भोरास संकाजी अथवा शंकराजी नारायण गांडेकर यांचेकडे बाळाजी उतरला. तेथून बाळाजी विश्वनाथ धनाजी जाधवाजवळ नोकरीस राहिला. बाळाजीची हुशारी पाहून धनाजी जाधव फार खूष झाला. या वेळीं औरंगजेबाचा मुक्काम दक्षिणेंत होता आणि छत्रपति संभाजी महाराजांचे पुत्र शाहू महाराज आणि राणी येसूबाई बादशाहाचे कैदेंत दक्षिणेंतच होते. सासवडचे पुरंदरे बादशाहाच्या नोकरींत होते. पुरंदरे आणि बाळाजी यांची मैत्री जमली व बाळाजी आणि शाहू महाराज यांची ओळख झाली.

पुढें कांहीं दिवसांनंतरची गोष्ट. बाळाजी विश्वनाथ त्या वेळीं पुण्याच्या सर सुभेदारीवर होता व बादशाहाचे मुक्काम कोरेगांव, तुळापूर, ब्रह्मपुरी, बहादूरगड, खटाव, पुणें, खेड व अहमदनगर या गांवाजवळ इ. स. १६९९ ते १७०२ या सालांत पडले. त्यामुळें मोगल सरदारांशीं बाळाजीची चांगली ओळख झाली. बाळाजीनें आपल्या वागणुकीनें बादशाही अम्मलदारांचा लोभ संपादन केला. शिधासामग्री किंवा इतर सामान मोगलांस पुरवून बाळाजीनें मोगलांत आपला मोठेपणा वाढविला. त्यामुळें त्याला शाहू महाराज कैदेंत असतांना त्यांच्यापर्यंत जातां येई. बाळाजीनें मोगलांच्या ओळखीचा फायदा घेऊन येसूबाई व शाहू महाराज या मायलेकांना आधार दिला.

सासवडच्या पुरंदऱ्यांची व बाळाजीची मैत्री असल्यानें सासवड-जवळच्या गराडे गांवची पाटीलकी बाळाजीनें खरेदी केली. म्हणजे बाळाजी आतां देशावरचा वतनदार बनला. बाळाजीला कोंकणापेक्षां गराडे, सासवड आणि पुणें आवडूं लागलें.

पुढें शाहू महाराजांची कैदेतून सुटका झाली. बाळाजीची आणि शाहू महाराजांची अगोदरचीच ओळख असल्यानें शाहू महाराज बाळाजीस कामगिरी सांगू लागले.

दमाजी थोरात, उदोजी चव्हाण वगैरे बंडखोर शाहू महाराजांचें ऐकत नसत. त्यांचा मोड करण्यासाठीं धनाजी जाधवाचा मुलगा चंद्रसेन याचे बरोबर बाळाजीस पाठविलें, पण तेथें काय झालें? पुढें पाहूं.

☆ ☆ ☆

## : २ : हरणावरून तंटा

शाहू महाराजांनीं चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ यांस दमाजी गायकवाड, उदाजी चव्हाण वगैरे बंडखोरांचा मोड करण्यास रवाना केलें.

चंद्रसेन जाधवाची सेना आणि बाळाजी विश्वनाथाची सेना रस्त्यानें चालूं लागली. चालतां चालतां उंबरज गांवची हद्द आली. तेथें एक हरण दृष्टीस पडलें. त्याबरोबर पिराजी राऊत हरणाच्या मागें

लागला. पिराजी राऊत हा बाळाजीच्या सेनेंतला सरदार होता. हरण पुढें आणि पिराजी मागें असें धांवतां धांवतां हरण सेनेच्या राहुट्यापाशीं आलें आणि एका राहुटींत शिरलें. ती राहुटी होती व्यासराव नांवाच्या ब्राह्मण कारकुनाची. व्यासराव होता चंद्रसेन जाधवाकडील कारकून. हरण जसें राहुटींत शिरलें, तसा पिराजी हरण पकडावयास राहुटीजवळ आला. व्यासराव कांहीं त्याला हरण देईना. व्यासराव म्हणाला, "आम्ही ब्राह्मण, आमच्या राहुटींत हरण आलें, त्याचें रक्षण आम्ही करणार." हो ना करतां करतां पिराजीनें हरणावर भाला टाकला. तोंच व्यासराव हरणापुढें आडवा आला. त्यामुळें व्यासरावाला भाला लागला. व्यासरावाला जखम झाली. व्यासरावानें चंद्रसेन जाधवाकडे फिर्याद केली. जाधवानें "पिराजीस आमच्या स्वाधीन करा," असें बाळाजीस सांगितलें. बाळाजी म्हणाला, "पिराजी आम्हांला शरण आला आहे. त्याला काय शिक्षा करायची ती आम्हीच करतों."

चंद्रसेन किंवा बाळाजी यांपैकीं कोणीच आपला हेका सोडीना. अखेर आपसांत लढण्याची वेळ आली. बंडखोरांचा मोड करणें बाजूलाच राहिलें. बाळाजी आपली सेना घेऊन निघाला तो पुरंदर किल्ल्यावर गेला. पुरंदर किल्ला सचिवाच्या ताब्यांत होता. सचिवाला चंद्रसेनानें निरोप पाठविला, "बाळाजीला आधार देऊं नका. आधार दिल्यास तुमच्याशीं लढाई करूं." यामुळें सचिवानें बाळाजीला आधार दिला नाहीं. बाळाजी व त्याची सेना निरेवर आली. तेथें जाधवानें बाळाजीचा मोड केला. मग बाळाजी परिंचे गांवावरून पलीकडे गेला. बाळाजीच्या

पथकांत पिलाजीराव जाधव वाडीकर व नाथाजी धुमाळ असे शूर शिलेदार होते. त्यांनीं व शाहू महाराजांचा सासरा कान्होजी राजे शिर्के यांनीं चंद्रसेन जाधवाला दाद न देतां बाळाजीला वाईजवळच्या पांडवगड किल्ल्यावर पोहोंचते केलें.

बाळाजीनें ही हकीकत अंबाजीपंत पुरंदरे याच्याबरोबर शाहू महाराजांना कळविली. शाहू महाजांनीं बाळाजीला साताऱ्याला बोलावून घेतलें व चंद्रसेनास येण्याबद्दल निरोप पाठविला. चंद्रसेनानें उद्धटपणें कळविलें कीं, " स्वामींनीं बाळाजीस माझ्या स्वाधीन करावें; त्यास आश्रय दिल्यास आम्हांस महाराजांचे पाय सुटतील." हें पत्र वाचतांच जाधवाची खोड मोडण्यासाठीं हैबतराव निंबाळकराला जाधवावर पाठवावयाचें ठरलें. त्या अगोदर पुन्हा शाहू महाराजांनीं चंद्रसेनाला कळकळीचे निरोप पाठविले; पण उपयोग झाला नाहीं. अखेर हैबतराव निंबाळकर चंद्रसेनावर निघाला. त्याबरोबर चंद्रसेन पांडवनगर सोडून निघाला. चंद्रसेनाची व हैबतरावाची गांठ जेऊर येथें पडली. लढाई झाली. जाधवाचा पुरा मोड झाला. जाधव पळत सुटला. तो रहिमतपुराहून पन्हाळ्याला गेला आणि ताराबाईला मिळाला. ताराबाई ही राजाराम महाराजांची बायको. ताराबाईला स्वतंत्र गादी स्थापावयाची होती.


ताराबाई

चंद्रसेन गेल्याबरोबर त्याचें सेनापतिपद दिनांक १–१०–१७११ रोजीं त्याचा भाऊ संताजी

याला शाहू महाराजांनीं दिलें. आतां संताजी जाधव शाहू महाराजांकडील सेनापति झाला.

बाळाजीनें पिलाजी जाधव व अंबाजी पुरंदरे यांच्या मदतीनें पैसा व फौज जमा केली. शाहू महाराजांनीं बाळाजीस पंचवीस लाखांचा सरंजाम करून दिला. बाळाजीनें चासकर जोशी व बारामतीकर जोशी यांजकडून पैशाची भरपूर मदत शाहू महाराजांसाठीं मिळविली. चासकर जोशी व बाळाजी हे व्याही व्याही होते. चासकर जोशांची मुलगी बाळाजीच्या मुलाला दिलेली होती.

शाहू महाराजांना बाळाजीची वागणूक पसंत पडूं लागली. बाळाजीचें धोरण शाहू महाराजांना पटूं लागलें. त्यामुळें पुढें त्यांनीं बाळाजीला पेशवाईचीं वस्त्रें दिलीं.


☆ ☆ ☆

## : ३ : पेशवाईचीं वस्त्रें

शाहू महाराज कैदेंत असल्यापासून त्यांना बाळाजीचा स्वभाव माहीत होता. शाहू महाराज इ.स. १७०७ मध्यें मोगलांच्या कैदेंतून सुटले आणि खेडच्या लढाईपासून बाळाजी शाहू महाराजास मदत करूं लागला. राजाराम महाराजांची बायको ताराबाई शाहू महाराजास राज्य देईना; तेव्हां इ.स.१७०७ पासून पांच वर्षें शाहू महाराजांना मोठीं त्रासाचीं गेलीं. त्या वेळीं शाहू महाराजांना


छत्रपति शाहू महाराज

बाळाजीनें फार मदत केली. शाहू महाराजांचा संतोष ज्यांत होईल, अशी बाळाजीची वागणूक होती.



खंडोबाचें देऊळ, जेजुरी.

चंद्रसेन जाधव ताराबाईच्या पक्षास मिळाला. आणि त्यानें कित्येक सरदारांना आपल्या बाजूला ओढलें. त्यांतच कृष्णराव खटावकर हा ब्राह्मण सरदार होता. याच्या घराण्यांत मुसलमानी अमलापासून मनसबदारी होती. याचा कुलस्वामी जेजुरीचा खंडोबा. जेजुरीच्या खंडोबाचें देऊळ यानेंच पहिल्यानें बांधलें. कृष्णराव मोठा विद्वान् होता. संस्कृत ग्रंथ उतरून घेण्यांत आणि देवदेव करण्यांत कृष्णराव आपला काळ घालवी. सहजासहजीं आपली मनसबदारी घालवावी शाहू महाराजांच्या पक्षास जावें असें कृष्णरावास कसें वाटणार ?

शाहू महाराजांनीं बाळाजीला कृष्णरावावर पाठविलें. लढाईंत कृष्णराव खटावकर व त्याचा वडील मुलगा मारला गेला. बाकीचीं मुलें बाळाजीला शरण आलीं. म्हणजे खटावकर हा मोठा मनसबदार शाहू महाराजांच्या पक्षांत आला.

तसेंच कान्होजी आंग्रे यांचें व शाहू महाराजांचें चांगलें होतें. यासाठीं हें पत्र वाचूं:—

दिनांक २३ मार्च सन १७०९

॥ श्री ॥

महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेशीं—

सेवक कान्होजी आंग्रे कृतानेक विज्ञापना. स्वामींचे कृपादृष्टी-करून यथास्थित असे. राजश्री बसवंतराव समागमें नगद व जिनसाची नेमणूक करून ठेवली होती, ते पाठविले असे.

नगद रुपये ५०००, सणगे ४२७३, कापड ८७९८, वजनी जिन्नस २००, लागवड ६७, पिकदाणी, समया, गुलाबदाणी, पलंग, पानदानें, वेलची, लवंग, गोरोचन.—सेवेसी पाठविले आहेत. याचा जाब सादर करावयास स्वामी धनी आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

अशा तऱ्हेनें कान्होजी आंग्रे शाहू महाराजांकडे वसूल व जिनसा पाठवीत असे. त्यालाहि ताराबाईनें आपल्या पक्षांत घेतलें. इ.स.१७ाहू महाराजांची पंचाईत झाली. शाहू महाराजांनीं बाळाजीला आंग्र्यावर स्वारी करावयास सांगितलें.

इ. स. १७१३ च्या पावसाळ्यांत आंग्र्यांचा बंडावा अनावर झाला. तेव्हां बाळाजीपंताशिवाय ही लढाई होणार नाहीं, असें खंडोबल्लाळ, परशुरामपंत प्रतिनिधि वगैरे सगळे म्हणूं लागले. तेव्हां शाहू महाराज बाळाजीला म्हणाले, "तुम्ही आंग्र्याचा बंदोबस्त करा म्हणजे तुम्हांला पेशवेपद देऊं."

यावर बाळाजीनें विनंती केली, "महाराजांची आज्ञा मला प्रमाण आहे; पण पदाचा जोर असल्याशिवाय कामगिरी कशी निभावेल!" शाहू महाराजांना हें सगळ्यांना दाखवावयाचें होतें कीं, आम्ही पदें वाटेल तेव्हां काढून दुसऱ्यास देतों. आंग्र्यांची सरखेली देखलि आम्ही काढूं व राजाची इभ्रत व राज्याची बळकटी वाढवूं.

पुण्याच्या दक्षिणेस चार कोसांवर मांजरी येथें शाहू महाराजांचा मुक्काम असतांना त्यांनीं बाळाजीला दिनांक १७ नोव्हेंबर इ. स. १७१३ रोजीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. आतां बाळाजीपंत पेशवे झाले.

बादली सणगें सहा, जवाहीर, शिरपेच, तुरा, कंठी, चौघडा, ढालतलवार, शिक्केकट्यार, साहेब नौबत हत्तीघोडे, जरीपटका, असे दिले. कर्डेरांजणगांव वगैरे पांच महालांची सरदेशमुखी दिली.

अंबाजीपंत पुरंदरे यास मुतालिकी दिली आणि रामाजीपंत भानु यास फडणिशी दिली.

## : ४ : आंग्र्याला वळविलें

बाळाजीपंत हे शाहू महाराजांचे पेशवे झाले व मराठी राज्याच्या बळकटीसाठीं ताबडतोब कामाला लागले.

बाळाजीपंत पेशव्यांनीं तीन-चार हजार फौज जमविली आणि पेशवे लोहगडापाशीं गेले. तेथून कान्होजी आंग्रे यांना पत्रें पाठविलीं. कान्होजी आंग्रे व बाळाजीपंत यांचा पूर्वींपासून घरोबा होता. आंग्रे पत्राप्रमाणें आले. पेशवे व आंग्रे यांची भेट ओलवण येथें झाली. नंतर आंग्रे कुलाब्याला गेले. मागाहून पेशवे दरकूच दरमजल करीत आंग्र्यांच्या भेटीस कुलाब्यास गेले. कान्होजी आंग्रे सरखेल भेटीस सामोरे आले. मग दोघांनीं बसून विचार केला, लढाईचें कारण उरलें नाहीं. महाराजांचे चाकर होऊन कृपा संपादन करून घ्यावी, असा आंग्र्यांचा विचार ठरला. आंग्र्यांनीं राजमाचीचा किल्ला आपणांकडे ठेवला. लोहगड, धनगड, तुंग, तिकोना हे किल्ले शाहू महाराजांकडे दिले.

साताऱ्यास जाऊन आंग्रे यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. ताबडतोब शाहू महाराजांनीं आंग्रे यांस सरखेलीचें पद दिलें. शिक्के व कट्यार दिली. पुन्हा बोलणीं झालीं. त्यांत ठरलें कीं, घाटावरचे किल्ले आंग्रे यांनीं घेतले असतील, ते परत द्यावेत. तसेच तळघाटचे किल्ले पेशव्यांनीं घेतले असतील, ते आंग्र्यांना द्यावेत. दरवर्षीं दसऱ्यापासून मार्गशीर्ष महिन्यापर्यंत कोंकणांत पेशव्यांनीं यावें व हबशी आणि इतर


परकी लोक असतील त्यांना पिटाळावें. इसवी सन १७१४ च्या फाल्गुन शुद्ध पंचमीस आंग्र्यांचा तह पुरा झाला. तह पुरा झाल्याबरोबर बाळाजीपंत, बहिरोपंत पिंगळ्यांबरोबर साताऱ्यास महाराजांच्या भेटीस आला. बाळाजीपंताचे अगोदर बहिरोपंत पिंगळे हा पेशवा होता; पण तो बाळाजीइतका हुषार नव्हता. या बहिरोपंताला कान्होजी आंग्रे यानें तुरुंगांत टाकलें होतें. लढाई केल्याशिवाय कान्होजी आंग्र्याला आपल्याकडे पुरा वळविल्याबद्दल शाहू महाराजांना बाळाजीपंताविषयीं धन्यता वाटली. बाळाजीपंताची छाप सर्वत्र बसली

कान्होजी आंग्रे यांना मुद्दाम शाहू महाराजांनीं भेटील बोलावलें. भेट जेजुरीला झाली. महिनाभर शाहू महाराज जेजुरीला होते. कान्होजी आंग्रे जेजुरीला होते. आंग्रे यांनीं महाराजांना भेट म्हणून अनेक तऱ्हेचे जिन्नस सुया, घड्याळें, तऱ्हेवाईक कापड, मेणबत्त्या, गुलाबपाणी, दारूकाम असे— दिले. महाराजांनीं आंग्र्यांचा चांगला मान ठेवला.

मराठी राज्याचा आधार पश्चिम किनारा. या पश्चिम किनाऱ्यावर मुख्य कान्होजी आंग्रे. कोंकणचें महत्त्व पूर्णपणें ओळखणारा बाळाजी विश्वनाथ पेशवाईवर येतांच त्यानें कान्होजी आंग्रे यास शाहू महाराजांच्या पक्षाकडे वळवलें. ताराबाईचा पक्ष मोडणें आणि राज्याची घडी बसविणें, अशा दोन्ही गोष्टी बाळाजीपंतानें साधल्या.

चंद्रसेन जाधव फुटून मोगलांस मिळाला. तशी वेळ येऊं नये म्हणून मराठे सरदारांना पराक्रम करण्याला पाहिजे तेवढा देश शाहू

महाराजांनीं मोकळा सोडला. सर्वांनीं राज्याच्या हितास जपलें पाहिजे, असें महाराजांचें व बाळाजीपंताचें म्हणणें. यामुळें मराठा सरदारांना पराक्रमाला वाव मिळाला व त्यांचे शत्रु मराठी राज्याचे शत्रु, तसेच मराठी राज्याचे शत्रु ते त्यांचे शत्रु ठरले आणि सर्वांवर मोठा दरारा बसला.



## : ५ : थोरातास नमविलें

पेशवे बाळाजी विश्वनाथानें आंग्रे यांना आपल्या बाजूस वळविल्याचें आपण पाहिलेंच. आतां थोरातांची हकीकत पाहूं.

पुण्याच्या पूर्वेला बारा कोसांवर मुळामुठा नदीच्या कांठीं हिंगणगांव आहे. या हिंगणगांवला गढी बांधून दमाजी थोरात मोठ्या डौलानें राहात होता. या दमाजी थोराताला रामचंद्रपंत अमात्यानें पुढें आणिलें. जिंजीचा वेढा चालू असतां पुणें देशाच्या पूर्व

भागाचा बंदोबस्त याच्याकडे होता. त्यासाठीं दमाजीला सुपें व पाटस या दोन परगण्यांची जहागीर दिलेली होती. थोरात मंडळीचा जमाव मोठा होता. आणि थोरातांना ' रुस्तुमराव ' असा किताब होता.

चंद्रसेन जाधवाच्या बाजूनें वागून दमाजीनें बंडावा आरंभिला. इसवीसन १७१६ मध्यें दमाजीनें फार मोठा उठाव केला. त्याला नरम करण्याचा विचार बाळाजी पेशव्यानें केला. पहिल्याप्रथम गोडीगुलाबीनें बोलणें चालणें झालें. कारण बाळाजी विश्वनाथाची आणि दमाजीची ओळख होती. बाळाजीला वाटलें दोन वर्षांपूर्वीं आंग्रयांना जसें आपण सामोपचारानें वळविलें, तसें दमाजीला वळवूं. हिंगणगांव व पुणें या ठिकाणीं बोलणेंचालणें होऊन असें ठरलें कीं, मैत्री पक्की करण्यासाठीं बाळाजीनें मुलांमाणसांसुद्धां हिंगणगांवास जाऊन पाहुणचार घ्यावा. दमाजी मोठाच बंडखोर असल्यानें काय करील आणि काय नाहीं याचा भरंवसा वाटेना! भरंवशासाठीं दमाजीनें बेलभंडार उचलून शपथ घेतली.

पेशवे बाळाजी विश्वनाथ पाहुणचारासाठीं दमाजी थोराताकडे हिंगणगांवास गेले. बरोबर पेशव्यांची बायको राधाबाई होती. पेशव्यांचे दोन्ही मुलगे बाजीराव व चिमाजीआप्पा हे होते, आणि अंबाजपंत पुरंदरे होते. हिंगणगांवचे गढींत शिरतांच दमाजीनें पेशव्याला कैद केलें. पेशव्याबरोबरच्या मंडळींना कैद केलें. बाळाजी विश्वनाथानें थोरातास शपथेची आठवण केली. थोरात म्हणाला, 'बेलभंडार म्हणजे तरी काय? एक झाडाचा पाला व दुसरी हळद आपण खातों. त्यांत

शपथ ती कसली? बाळाजीचा उपाय खुंटला. थोरात एवढेंच करून राहिला नाहीं. या पाहुण्यांना त्यानें उपाशीं ठेवलें. उन्ह उन्ह राखेचे तोबरे देण्याचा धाक घातला आणि भला भक्कम दंड मागितला. दंड मागितल्यावर बाळाजी म्हणाला, "आम्ही कांहीं बरोबर पैसे आणले नाहींत." तेव्हां थोरातानें बाळाजीस पैसे आणण्याकरितां कैदेंतून मोकळें केलें आणि बाकीची मंडळी कैदेंतच ठेवली.

बाळाजी ताबडतोब शाहू महाराजांकडे गेला. नंतर आप्पाजी माणकेश्वर, मोरशेट करंजे यांजकडून पैसा आणला थोराताचा दंड भरला आणि बायकामुलांची व सर्वांची सुटका केली.

नंतर थोराताला कसा नमवावा, याचा विचार झाला. मातबर सरदारांत सचिव मोठे होते, पण सचिव नारो शंकर नऊ वर्षांचा लहान मुलगा होता. तथापि त्याची आई येसूबाई सचिव मोठी चतुर होती. येसूबाई सचिव इनें आपला कारभारी रांझेकर याला हाताशीं घेऊन थोरातावर स्वारी करण्याची तयारी केली. थोरातावर सचिवाची सेना येऊं लागली तोंच थोरातानें येसूबाई सचिव व इचा लहान मुलगा नारोशंकर पकडून आणला आणि हिंगणगांवांत बंदोबस्तानें ठेवला आणि तुम्ही आमच्या वाटेस जाल तर तुमच्या मुलास ठार मारूं, असा येसूबाई सचिव इला निरोप पाठवला. नारोशंकर विचित्रगडावर होता; पण त्याचा शोध करून थोरातानें त्यास पकडून आणलें होतें; म्हणजे दोन वेळेला कमाजी थोरातानें [illegible]स पेचांत धरलें.

[illegible] थोरात पैशाचा भारी लोभी. त्याला पुन्हा भरभक्कम दंड भरला आणि नारोशंकर सचिवाला सोडवून आणला.

मग बाळाजी पेशव्यानें मोठी खुबी केली. दमाजी थोरात मोगलांचा ताबेदार म्हणवीत होता. तेव्हां मोगलांचा सरदार हुसेन सय्यद याच्याकडे बाळाजीनें दळणवळण ठेवलें. मोगलांचा तोफखाना मदतीला घेतला. हिंगणगांवावर मोर्चे लावून हिंगणगांव सर केलें. थोरातास पकडलें आणि पुरंदरावर नेऊन कैदेंत टाकलें. हिंगणगांवची गढी जमीनदोस्त केली ! तिची मातीसुद्धां मुळामुठा नदींत फेकून दिली ! ( इ. स. १७१८ ). अशा तऱ्हेनें बाळाजीनें दमाजी थोरातास नमविलें.

☆ ☆ ☆

## : ६ : पुणें प्रांत ताब्यांत आणला

बाळाजी विश्वनाथानें दमाजी थोरातास नमविल्याचें मागील पाठांत आपण वाचलें. आतां खुद्द पुणें प्रांताची गोष्ट पाहा. शाहू महाराज गादीवर बसले. त्यांनीं अष्टप्रधान नेमले; तरी मोगलांचे डावपेच नेहमीं सुरू असत. खुद्द शिवाजी महाराजांचा जावई महादजी निंबाळकर याचा नातू रंभाजी ऊर्फ रावरंभा निंबाळकर हा मोगलांना जाऊन मिळाला होता आणि इ. स. १७१३ ते १७१५ पर्यंत मराठ्यांच्या ताब्यांत पुणें राहूं नये अशी त्यानें खटपट केली. त्याच्या मदतीला चंद्रसेन, निजाम आणि कोल्हापूरकर संभाजी हे होते. पुण्यांतील मोगलांचा अम्मल उठविल्याखेरीज खरें स्वराज्य आलें, असें लोकांस कसें वाटणार? यासाठीं बाळाजीनें जोरदार प्रयत्न चालविला. इतक्यांत त्याला शाहू महाराजांचें पत्र आलें, "निंबाळकर वगैरेंनीं एकत्र होऊन जमाव केला आहे. वाई-

देशीं येऊन धामधूम करणार. तरी तुम्हीं जमावानिशीं येणें." बाळाजीला ताबडतोब वाईकडे जाणें भाग पडलें. बाळाजी विश्वनाथ असाच सेनेसुद्धां गंगथडीवर होता. त्याला शाहू महाराजांना पत्र पाठवावयाला बरेच दिवस सवड सांपडली नाहीं. तेव्हां महाराजांनीं त्यास पत्र पाठविलें तें असें— " रा. रा. बाळाजी पंडित प्रधान यांस आज्ञा केली ऐसीजे. अलीकडे तुमचें विनंतीपत्र येत नाहीं. सांप्रत तुम्ही कोठें आहां, काय मनसुबा करीत आहांत, तें कळलें नाहीं. या प्रांतीं करवीरकरांनीं निजाम उल्मुल्क यांचें साहाय्य करून घेऊन दंगा करण्याचा विचार केला. हें वर्तमान विस्तारें तुम्हांस कळावें यांजकरितां पत्रें लिहिलीं. सादर झालींच असतील. नबाबाचा अदूरपणाचा प्रकार व करवीरकरांची कोती अंदेशी हे दोन अर्थ एकत्र झाले आहेत. याचा परिणाम कळलाच आहे. तथापि तुम्हीं दूर देशीं असतां मनसुबा प्राप्त झाला, याची तोड तुम्हांस कळेल त्या रीतीनें करालच. तुम्हांसारखे अतुल पराक्रमी सेवक असतां स्वामींनीं या मनसुब्याचा हृद्रोग वागवावा, असा प्रकार नाहीं."

हें पत्र मिळतांच बाळाजी चपळाईनें पुणें प्रांतीं येऊं लागला. इतक्यांत त्याच्या सुदैवानें दक्षिणेंतून निजामाची बदली बादशाहानें केली. निजामाचें व नवीन येणाऱ्या दक्षिणच्या सुभेदाराचें वांकडें होतें. या नवीन सुभेदाराचें नांव हुसेन सय्यद. हा बाळाजीचा दोस्त बनला. त्याबरोबर करवीरकर संभाजीराजा गप्प बसला. लगेच इसवी सन १७१५ च्या नोव्हेंबरांत बाळाजी विश्वनाथानें व्यंकोजी ढमढेरे यास रंभाजी निंबाळकराच्या ठाणेदारावर पाठविलें. निंबाळकराच्या ठाणेदाराचा पराभव झाला आणि पुण्यास बाळाजी विश्वनाथ पेशव्याचा अम्मल बसला.

मोगल सुभेदार हुसेन सय्यद मराठ्यांना अनुकूल असल्यामुळें सर्व पुणें प्रांत स्वराज्यांत आला. ज्याच्या हातांत पुणें तो स्वराज्याचा मालक अशी स्थिति असल्यानें बाळाजी विश्वनाथानें पुणें घेतल्यामुळें त्याचें महत्त्व आपोआप वाढलें. शिवाजी महाराजांचें बाळपणचें ठिकाण ताब्यांत आल्यामुळें शाहू महाराजांना समाधान झालें. सर्व स्वामिनिष्ठ माणसांना समाधान वाटलें.

## : ७ : सय्यदबंधूंपैकीं एक

दिल्लीचा औरंगजेब बादशाहा इ. स. १७०७ मध्यें दक्षिणेंत मरण पावला; पण मराठ्यांनीं कांहीं त्याला दाद दिली नाहीं, हें तुम्हांला माहीत आहेच. त्यानंतर त्याचा मुलगा बहादुरशाहा गादीवर बसला. तो इ. स. १७१२ मध्यें मरण पावल्यावर सय्यदबंधूंच्या मदतीनें फर्रुखसियर दिल्लीचा बादशाहा झाला. ( इ. स. १७१३ ).

फर्रुखसियर बादशाहा झाल्यावर त्याला सय्यदबंधूंची भीति वाटूं लागली म्हणून त्यानें सय्यदबंधूंपैकीं एका भावाची म्हणजे हुसेन सय्यद याची दक्षिणच्या सुभ्यावर इ.स.१७१५ मध्यें नेमणूक केली आणि दक्षिणेकडील दाऊदखान पन्नी नांवाच्या सरदाराला हुकूम पाठविला कीं, 'हुसेन सय्यदला कारभार न देतां मारून टाकावें.' त्याप्रमाणें हुसेन सय्यद नर्मदेपाशीं येतांच दाऊदखान त्याजवर चालून आला आणि तो हुसेन

सय्यदचा परत जाण्याचा हुकूम मानीना. अखेर त्यांची बऱ्हाणपुराजवळ लढाई होऊन तिच्यांत दाऊदखान ठार झाला.

हुसेनअल्लीचा नाश करण्याविषयीं मराठ्यांनासुद्धां दिल्लीचा बादशाहा फर्रुखसियर यानें कळविलें होतें. मराठेहि स्वाऱ्या करून हुसेनअल्लीला त्रास देऊं लागले. तेव्हां मराठ्यांशीं गोडी करण्याचें हुसेनअल्ली सय्यदनें ठरविलें. याकामीं त्याला शंकराजी मल्हारचा उपयोग झाला. शंकराजी मल्हार, राजाराम महाराजांच्या वेळीं सचिव होता. पुढें तो काशीस गेला होता व काशीहून दिल्लीस गेला होता आणि दिल्लीस मराठ्यांच्या वतीनें कारस्थानें करीत होता. हा शंकराजी मल्हार या वेळीं दक्षिणेंत आलेला होता. शंकराजी मल्हारमार्फत बाळाजीपंताकडे हुसेनअल्ली सय्यदाच्या वाटाघाटी चालल्या. शंकराजी मल्हार साताऱ्यास आला. त्याची बडदास्त फार चांगली ठेवली. शंकराजी मल्हार, बाळाजीपंत पेशवे, चिमणाजी दामोदर, शाहू महाराज व हुसेनअल्ली सय्यद यांच्यांत वाटाघाटी होऊन दिल्लीच्या बादशाहाशीं मराठ्यांचा तह झाला. त्यांच्यांतल्या अटी अशा :—

(१) शिवाजीच्या वेळचें स्वराज्य तमाम गडकोट सुद्धां शाहूचे हवाली करावें. (२) अलीकडे मराठे सरदारांनीं जिंकलेले प्रदेश म्हणजे खानदेश, गोंडवण, वऱ्हाड, हैदराबाद, कर्नाटक मोगलांनीं सोडून देऊन ते मराठ्यांच्या स्वराज्यांत दाखल करावे. (३) मोगलांच्या दक्षिणेंतील मुलखावर चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मराठ्यांनीं स्वतः वसूल करावे. या चौथाईच्या बदल्यांत आपली पंधरा हजार फौज

मराठ्यांनीं बादशाहाच्या मदतीस ठेवावी. (४) कोल्हापूरच्या संभाजीस शाहूनें त्रास देऊं नये. (५)मराठ्यांनीं दरसाल बादशाहास दहा लाख रुपये खंडणी द्यावी आणि (६) शाहूची आई, बायको वगैरे मंडळी दिल्लीस बादशाहाच्या ताब्यांत आहेत, त्यांस मोकळें करून स्वदेशीं पाठवावें.

हा तह झाल्याबरोबर बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें दिनांक ३० जुलई १७१८ ला देशमुख, देशपांडे यांस आज्ञापत्र काढलें ते असें:— " प्रांत पुणें देखील ठाणें आम्हांकडे स्वराज्य नबाबापासून करार झालें आहे, तरी रंभाजी निंबाळकराकडे वसूल न देणें. वसूल द्याल तो दुप्पट घेतला जाईल. मारलें जाल. "

स्वराज्यांतील वसुलासाठीं बाळाजी विश्वनाथ स्वतः सातारा, वाई, भुइंज, उरुळी अशा ठिकाणीं फिरत राहिला. महाराजांचे जवळ राहणारें हुजुरात नांवाचें पथक याच वेळेला तयार झालें. या हुजुरात पथकाचा नायक खुद्द बाळाजी विश्वनाथ झाला. वरील तहामुळें मराठमंडळाचें लक्ष घरगुती भांडणांतून निघालें आणि बाळाजी विश्वनाथाचा हेतु सिद्धीस गेला. बादशाहाच्या तैनातीस फौज देणें म्हणजे त्याच्या रक्षणाची जबाबदारी मराठ्यांनीं घेणें असा अर्थ झाला. मराठी राज्याची इभ्रत वाढली. राज्यकारभाराची नीट घडी बसली. मुलुखांत शांतता उत्पन्न झाली.

तह केला हुसेनअल्ली सय्यदानें महाराष्ट्रांत; पण तो तह दिल्लीचा बादशाहा मानीना. मग बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें पुढें काय केलें? पाहूं या.

☆ ☆ ☆

## बाळाजीची दिल्लीवर स्वारी

बाळाजी विश्वनाथानें दिल्लीस जाण्याचा ठराव केला. फौजेच्या खर्चाबद्दल नर्मदा नदी उतरल्यापासून परत येईपर्यंत पन्नास हजार रुपये दररोज देण्याचा व दिल्लीच्या बादशाहाकडून तहाच्या कबुलीचें फर्मान देवविण्याचा हुसेनअल्ली सय्यदानें करार केला.

हुसेनअल्ली सय्यद हा तरी कां कबूल झाला ? त्याला त्याचा भाऊ अबदुल्ला सय्यद यानें दिल्लीला बोलावलें. दिल्लीला ताबडतोब बोलावण्याचें कारण बादशाहाचें आणि अबदुल्ला सय्यदाचें फारच वाकडें आलें होतें आणि हुसेनअल्ली सय्यदाचें व बादशाहाचें तरी कोठें सरळ होतें ? बादशाहानें दिल्लीहून नवे नवे लोक दक्षिणेंत हुसेन अल्लीचा अपमान करण्यासाठीं नेमले होते. त्याचा राग हुसेन-अल्लीला होताच. यामुळें त्यानें बाळाजी विश्वनाथाची फौज बरोबर घेतली. बाळाजी विश्वनाथाबरोबर त्याचा मुलगा बाजीराव, बाळाजी महादेव भानु फडणीस होता. शिवाय खंडेराव दाभाडे, उदाजी पवार संताजी व राणोजी भोसले होते. अकराबारा हजार मराठ्यांची फौज दिल्लीवर निघाली. दररोज दर शिपायास एक रुपया याप्रमाणें हुसेन अल्ली खर्च देणार होता. मराठयांची सर्व प्रकारची व्यवस्था सय्यदाच्या वतीनें शंकराजी मल्हार पाहात होता. शंकराजी मल्हारवर सय्यदाचा विश्वास होता. सय्यदाकडून मराठे सरदारांचा व लष्कराचा

मानमतराब चांगला ठेवला गेला. इसवी सन १७१८ च्या नोव्हेंबरांत औरंगाबादेहून हुसेनअल्ली निघाला. मराठ्यांची फौज निघाली. नगरहून स्वारी चालू झाली. दिनांक ३० नोव्हेंबरला फौजेचा मुक्काम बऱ्हाणपूरला पडला. दिनांक १९ जानेवारी १७१९ ला मराठ्यांची स्वारी नालछ्या-पर्यंत आली. १६ फेब्रुवारीला मराठे यमुनेच्या दक्षिण तीरावर इंद्र-प्रस्थापाशीं येऊन धडकले.

एवढ्या मोठ्या तयारीनिशीं हुसेनअल्ली सय्यद येतो आहे, अशी बादशाहास खबर लागतांच तो घाबरून गेला. बादशाहानें आपल्या भरंवशाचे सरदार हुसेनअल्लीकडे पाठविले. आणि हुसेनअल्लीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मराठे व हुसेनअल्ली माळव्यांत असतांनाच मराठ्यांच्या सर्व मागण्या बादशाहानें कबूल केल्या. तेव्हां हुसेन सय्यदसुद्धां दाक्षिणेस परतण्याचा विचार करूं लागला; पण शाहू महाराजांचीं बायकामुलें ताब्यांत आल्याशिवाय बाळाजी विश्वनाथ परत फिरण्यास कबूल होईना.

हुसेन सय्यदानें बादशाहास कळविलें कीं, " अर्ध्या वाटेंतून मी असाच परत गेल्यास हे जोरदार मराठे नाराज होतील. वाटेंत ते मला असा त्रास देतील आणि त्यामुळें मला कमीपणा येईल. "

शिवाय हुसेन सय्यदानें बादशाहाला पक्कें घेरण्यासाठीं एक युक्ति केली—औरंगजेब बादशाहाचा मुलगा संभाजी महाराजांकडे आला होता व तेथून तो इराणांत निघून गेला. या अकबराचा मुइनुद्दीन नांवाचा मुलगा असून तो हल्लीं मराठ्याच्या ताब्यांत आहे. शाहू महाराजांची

आई बायको वगैरे मंडळी सोडून दिल्यास या मुइनुद्दिनास म्हणजे शाहाजाद्यास बादशाहाच्या ताब्यांत देऊं, असें मराठे म्हणतात. या बरोबर बादशाहानें "मुइनुद्दिनास पाठवा. मी शाहू महाराजांचीं बायकामुलें सोडतों,–" असें कळविलें.

खरोखर पाहतां मुइनुद्दीन वगैरे कोणी नव्हते. परंतु बादशाहाला बनविण्यासाठीं ती एक युक्ति होती. हुसेनअल्ली सय्यदानें औरंगाबादे-जवळ आपल्या तंबूशेजारीं दुसरी सुंदर उतरण्यासाठीं जागा तयार केली आणि शाहाजादा आला, असें दाखविण्यासाठीं एक दुसराच मनुष्य तयार केला आणि त्याला मिरवीत मिरवीत आपल्या शेजारच्या भव्य तंबूत ठेवला. अशा रीतीनें प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणीं हुसेन-अल्ली आपल्या तंबूशेजारीं शाहाजाद्याचा तंबू ठोकी आणि त्याला रोज भेटावयास जाई, असें हें सोंग दिल्लीपर्यंत चाललें होतें

मराठी सैन्याचा सर्व खर्च हुसेनअल्ली सय्यदामार्फत होत असल्यानें बाळाजी विश्वनाथ मराठ्यांचे सरदार आणि शिपाई सर्व लोक मोठ्या खुशींत दिल्लीकडे चालले होते. खरोखर दिल्लीकडे जाणें म्हणजे मोठ्या अभिमानाची गोष्ट होती.

हुसेनअल्लीची समजूत कशी पाडावी हें बादशाहास समजेना. दोघे सय्यदबंधु मोठ्या बंदोबस्तानें होते. दोघांच्या छावण्या दिल्ली-जवळ वेगवेगळ्या ठिकाणीं होत्या. हुसेनअल्लीजवळ तीस हजार सेना होती. कांहीं तरी भयंकर प्रकार होणार असें वाटूं लागलें.

सय्यद बंधू आणि बादशाहा बहादुरशाहा यांच्या तेढींत मराठ्यांचें काम होण्याचा रंग दिसूं लागला. बाळाजी विश्वनाथ व शंकराजी मल्हार यांची मसलत यशस्वी झाली.

☆ ☆ ☆

## :९: दिल्लीची दंगल व बाळाजीची चंगळ

सय्यद हुसेनअल्ली बाळाजी विश्वनाथाच्या फौजेसुद्धां दिल्लीला पोहोंचला; तेव्हां त्याचा चेहरा अक्राळविक्राळ दिसत होता. दिनांक २३ फेब्रुवारी १७१९ उजाडला.

राजवाड्याजवळ हुसेनअल्लीकडील नौबत वाजली. नौबतीचा आवाज बादशाहाला धोक्याच्या सूचनेसारखा वाटला. राजवाड्यापाशीं असंख्य घोडेस्वार खडे होते. घोड्यांच्या पायांच्या धुळीनें सर्व दिल्ली झाकाळून गेली. हे सर्व मराठे घोडेस्वार होते.

अब्दुल्ला सय्यदानें सुद्धां आपली फौज सरकारवाड्यापाशीं आणली होती. दोघांनीं फौजा वाड्याबाहेर खड्या ठेवल्या.

दोघे सय्यद बंधु सरकार वाड्यांत घुसले. बादशाहानें भीत भीत त्यांचा सत्कार केला. बादशाहानें विचारलें, "मुइनुद्दिनखानास तुम्हीं कैद करून आणलें आहे, म्हणून कळविलें तो कोठें आहे?"

हुसेनअल्लीनें उत्तर दिलें, "शाहूची मंडळी सोडून द्या म्हणजे त्यास आणतों." त्याबरोबर मदनसिंगास आणून बाळाजी विश्वनाथाच्या हवालीं करण्यांत आलें.

सय्यद बंधु आणि बादशाहा यांत खूप वादविवाद झाला. नंतर गोडी झाली असें लोकांस वाटलें; पण खरी गोडी झाली नाहीं.

शिकारीच्या निमित्तानें हुसेनअल्लीला बाहेर न्यावें व त्याचा खून करावा असा बेत बादशाहानें चालवला. तो बेत हुसेनअल्लीला समजला. दिनांक २७ फेब्रुवारीला सकाळीं सय्यद अब्दुल्ला लाहोर दरवाजावर फौज ठेवून राजवाड्यांत शिरला. हुसेनअल्लीनें शहरांत ठिकठिकाणीं नाकेबंदी केली. मराठी फौज राजवाड्याच्या बाहेर ठेवली आणि स्वतः हुसेनअल्ली राजवाड्यांत शिरला. रात्रभर सय्यद बंधु राजवाड्यांतच होते. बादशाहाची व सय्यदबंधूंची खूप बोलाचाली झाली. बादशाहा फार रागावला. त्याबरोबर सय्यद बंधूंनीं राजवाडा ताब्यांत घेतला. दि. २८ फेब्रुवारी इसवी सन १७१९ ला दिल्लींत भीति वाटण्याजोगा देखावा दिसूं लागला. रस्त्यानें जिकडे तिकडे सेना दवडूं लागल्या. कोणास कोणी ओळखीना. इतकी दंगल माजली. त्या रेटारेटींत जवळ जवळ दोन हजार गडी कापला गेला.

सय्यदबंधूंनीं बादशाहास कैद केलें आणि रफिउद्दराजत यास बादशाही सिंहासनावर बसविलें. जुन्या बादशाहाच्या बाजूचे राजपूत राजे दिल्लींतून निघून गेले. सगळा बादशाही कारभार सय्यदबंधूंनीं आपल्या हातांत घेतला. माळव्याच्या सुभेदारीवर त्यांनीं निजामाची नेमणूक केली. निजाम खूष झाला. निजामानें बाळाजी विश्वनाथ पेशव्यास भाईचारा केला. भाईचारा म्हणजे मेजवानी, निजाम बादशाहापाशीं बाळाजीची स्तुति करूं लागला, तारीफ करूं लागला

हुसेनअल्ली ठरलेल्या तहाप्रमाणें बाळाजीशीं वागला. शाहू महाराजां-कडील जी मंडळी बादशाही कैदेंत होती, ती सय्यद बंधूंनीं बाळाजी विश्वनाथाच्या स्वाधीन केली.

चौथाईची सनद, सरदेशमुखीची सनद आणि स्वराज्याची सनद बाळाजीपंत पेशव्यानें बादशाहाकडूनच मिळविली.

चौथाईची सनद काय होती? शिवाजी महाराजांनीं औरंगजेबाच्या मुलखावर स्वाऱ्या केल्या, तेव्हां रयत लोकांनीं महाराजांना विनंती केली कीं, आम्ही गरीब रयत, आम्हांला उपद्रव देऊं नये. शिवाजी महाराजांनीं जाहीर केलें. स्वराज्याबाहेरील प्रदेशांनीं आमच्या फौजेच्या खर्चासाठीं सालोसाल चौथाईची रक्कम म्हणजे एकंदर वसुलाचा चौथा हिस्सा आम्हांस देत जावा. पुढें चौथाई वसूल करण्याच्या निमित्तानें मराठे माळवा बंगाल इकडे जाऊं लागले. तो त्रास बंद व्हावा म्हणून बादशाहानें दक्षिणच्या सहा मोगली सुभ्यांवर चौथाई हक्क वसूल करण्याची सनद बाळाजी विश्वनाथापाशीं दिली.

सरदेशमुखीची सनद म्हणजे— शिवाजी महाराजांनीं असें ठरविलें होतें कीं, छत्रपति हाच एकंदर स्वराज्याचा सरदेशमुख. तो हें वतन आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल त्यास देईल. सरदेशमुखीचा हक्क वसूल करण्यास मोगल अधिकारी हरकत करूं लागले, ती त्यांनीं करूं नये म्हणून बाळाजीनें बादशाहापासून सरदेशमुखीची सनद मिळाविली.

स्वराज्याच्या सनदेंत— १ पुणें, २ बारामती, ३ इंदापूर, ४ वाई, ५ मावळें, ६ सातारा, ७ कसराबाद, ८ खटाव, ९ माण, १० फलटण,



बादशाहाकडून बाळाजीपंतानें स्वराज्याची सनद मिळविली.

११ मलकापूर, १२ तारळें, १३ पन्हाळा, १४ आजरें, १५ जुन्नर आणि १६ कोल्हापूर या प्रांतांचीं नांवें असून शिवाजी महाराजांनीं जिंकलेले सर्व किल्ले आणि कोंकणाचा उल्लेख आहे. ह्या तिन्ही सनदा इ. स. १७१९

सालीं बादशाहा महंमदशाहा याच्या नांवानें सय्यद बंधूंकडून बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें लिहून घेतल्या. सनदा घेऊन मराठे निघाले. अशी दिल्लीच्या लोकांना खबर लागली. बाळाजीला मारण्याचा कांहीं लोकांनीं कट केला. बाळाजी विश्वनाथाबरोबर बाळाजी महादेव भानु आलेला होता. बाळाजी भानूनें पेशव्यांचा आंगरखा घातला. पेशव्यांचें पागोटें घातलें आणि तो पालखींत बसला. पेशव्याची पालखी दिल्लींतून बाहेर पडूं लागली. मोगलांनीं हल्ला चढवला. पेशवा ठार झाला. सनदा दक्षिणेंत गेल्या नाहींत, असें लोकांस वाटलें; पण सनदा सुरक्षित बाळाजी विश्वनाथ भट पेशवे यांजजवळ राहिल्या आणि पेशव्यांच्या ऐवजीं स्वराज्याच्या कामासाठीं बाळाजीपंत भानूनें मरण ओढवून घेतलें. असे होते स्वामिनिष्ठ पुरुष म्हणूनच बाळाजीला पेशवाई यशस्वी करतां आली.

संग्रह अनुक्रम

## : १० : धन्य बाळाजीपंत पेशवे

दिनांक २० मार्च १७१९ चा दिवस उजाडला. बाळाजीपंतांनीं दिल्लींतलें काम यशस्वी केलें होतें. चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्याच्या सनदा मिळाविल्या होत्या. राजघराण्यांतलि मंडळी परत मिळाविली होती. बाळाजी विश्वानाथानें दिल्ली सोडली. काशीविश्वेश्वराचें दर्शन घेण्यासाठीं बाळाजी काशीकडे वळला. नंतर औरंगाबादेवरून पावसाळ्यांत पेशवा सातार्‍याला आला.

"महाराजांच्या भेटी झाल्या. मुलेंमाणसें भेटविलीं, मातुःश्रींची भेट झाली. यावरून बहुत संतोषी होऊन शाहू महाराज कृतार्थ झाले. सय्यदांकडून दररोज पन्नास हजार रुपये पावत होते. त्यांपैकीं निम्मे फौजेस खर्च करून बाकी खजिना बाळगून बाळाजी विश्वनाथ साताऱ्यास महाराजांच्या दर्शनास गेले."

दिल्लीच्या स्वारींतून आल्यानंतर बाळाजीपंतांनीं कित्येक लाख रुपये जामदारखान्यांत भरले आणि फौजेच्या देण्याचा बोभाट महाराजांकडे तिळभर ठेवला नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि सरदारांस कामगिरी सांगितली तर हा सैनिकांच्या देण्याचा बोभाट फार राहात असे. बाळाजीपंतांनीं सैनिकांच्या देण्याची बाब निकालांत काढल्यामुळें याप्रमाणेंच चोख व्यवस्था स्वारीची चालावी असें सरदारांस व स्वतः शाहू महाराजांस वाटूं लागलें.

सनदा मिळाल्यानें, बादशाहाच्या कैदेंतील मंडळी आल्यानें संभाजीचा मराठी राज्यावरील हक्क निकालांत निघाल्यानें मराठमंडळास आनंद वाटला. शिवाय स्वारींत पैशाची मिळकत झाली. खर्च भागून खजिन्यांत ठेवायला बराच पैसा शिल्लक राहिला. सर्व मोठ्या लोकांना व सरदारांना बादशाहाकडून पोषाख मिळाला होता.

जे लोक दिल्लींत कापले गेले होते, त्यांच्या कुटुंबांतील मंडळींना इनामें वगैरे मिळालीं. दिल्लीला संताजी भोसले मारला गेला. त्याचा भाऊ राणोजी याला "सवाई संताजीराव" असा किताब मिळाला. बाळाजीपंत भानु बाळाजी विश्वनाथाच्या पेशव्यांच्या पालखींत बसून

जात असतां दिल्लीच्या लोकांकडून मारला गेला म्हणून त्याच्या भावांना बाकसई गांव इनाम दिला. असा जिकडे तिकडे परम संतोष झाला.

बाळाजीपंताचें आयुष्य फार दगदगींत गेलें. त्याला सारखें लढायावर जावें लागे. मराठी राज्याची पुन्हा घडी बसविण्याचें काम त्यानें केलें. शाहू महाराजाचें आणि संभाजी महाराजांचें भांडण त्याला अखेरपर्यंत पुरलें. इ. स. १७२० च्या मार्च महिन्यांत बाळाजीपंत करवीरच्या मोहिमेवरून परत आला. तो साताऱ्यावरून सासवडला गेला. तेथें चैत्र शुद्ध षष्ठी शनिवार शके १६४२ दिनांक २ एप्रिल १७२० रोजीं मरण पावला. मरणसमयीं बाळाजीपंत साठीच्या घरांत होता.



बाजीराव पेशवे

बाळाजपिंत नानाच्या बायकोचें नांव राधाबाई. राधाबाईला लिहितां वाचतां येत होतें. बाळाजपिंताला दोन मुलगे व दोन मुली होत्या. थोरला मुलगा विसाजी ऊर्फ बाजीराव आणि धाकटा मुलगा चिमणाजी आप्पा.

बाळाजी विश्वनाथानें, " महाराजांची सेवा निष्ठेनें करून, मर्द व शहाणे राज्यांत मनुष्य नाना, ऐसा लौकिक वाढवून, महाराजांची कृपा संपादून प्रधानपद मिळविलें. अतिशय श्रम करून शत्रु पराभवातें पाववून महाराजांच्या राज्याचा बंदोबस्त केला."

शाहू महाराजांचा पक्ष उचलून धरला. हीच बाळाजीपंत नानाची मोठी कामगिरी होय. त्यानें मराठमंडळास मुलुखगिरीस नवें क्षेत्र

" महाराजांच्या भेटी झाल्या. मुलेंमाणसें भेटविलीं, मातुःश्रींची भेट झाली. यावरून बहुत संतोषी होऊन शाहू महाराज कृतार्थ झाले. सय्यदांकडून दररोज पन्नास हजार रुपये पावत होते. त्यांपैकीं निम्मे फौजेस खर्च करून बाकी खजिना बाळगून बाळाजी विश्वनाथ साताऱ्यास महाराजांच्या दर्शनास गेले. "

दिल्लीच्या स्वारींतून आल्यानंतर बाळाजीपंतांनीं कित्येक लाख रुपये जामदारखान्यांत भरले आणि फौजेच्या देण्याचा बोभाट महाराजांकडे तिळभर ठेवला नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि सरदारांस कामगिरी सांगितली तर हा सैनिकांच्या देण्याचा बोभाट फार राहात असे. बाळाजीपंतांनीं सैनिकांच्या देण्याची बाब निकालांत काढल्यामुळें याप्रमाणेंच चोख व्यवस्था स्वारीची चालावी असें सरदारांस व स्वतः शाहू महाराजांस वाटूं लागलें.

सनदा मिळाल्यानें, बादशाहाच्या कैदेंतील मंडळी आल्यानें संभाजीचा मराठी राज्यावरील हक्क निकालांत निघाल्यानें मराठमंडळास आनंद वाटला. शिवाय स्वारींत पैशाची मिळकत झाली. खर्च भागून खजिन्यांत ठेवायला बराच पैसा शिल्लक राहिला. सर्व मोठ्या लोकांना व सरदारांना बादशाहाकडून पोषाख मिळाला होता.

जे लोक दिल्लींत कापले गेले होते, त्यांच्या कुटुंबांतील मंडळींना इनामें वगैरे मिळालीं. दिल्लीला संताजी भोसले मारला गेला. त्याचा भाऊ राणोजी याला " सवाई संताजीराव " असा किताब मिळाला. बाळाजीपंत भानु बाळाजी विश्वनाथाच्या पेशव्यांच्या पालखींत बसून

जात असतां दिल्लीच्या लोकांकडून मारला गेला म्हणून त्याच्या भावांना बाकसई गांव इनाम दिला. असा जिकडे तिकडे परम संतोष झाला.

बाळाजीपंताचें आयुष्य फार दगदगींत गेलें. त्याला सारखें लढायावर जावें लागे. मराठी राज्याची पुन्हा घडी बसविण्याचें काम त्यानें केलें. शाहू महाराजाचें आणि संभाजी महाराजांचें भांडण त्याला अखेरपर्यंत पुरलें. इ. स. १७२० च्या मार्च महिन्यांत बाळाजीपंत करवीरच्या मोहिमेवरून परत आला. तो साताऱ्यावरून सासवडला गेला. तेथें चैत्र शुद्ध षष्ठी शनिवार शके १६४२ दिनांक २ एप्रिल १७२० रोजीं मरण पावला. मरणसमयीं बाळाजीपंत साठीच्या घरांत होता.

बाळाजीपंत नानाच्या बायकोचें नांव राधाबाई. राधाबाईला लिहितां वाचतां येत होतें. बाळाजीपंताला दोन मुलगे व दोन मुली होत्या. थोरला मुलगा विसाजी ऊर्फ बाजीराव आणि धाकटा मुलगा चिमणाजी आप्पा.


बाजीराव पेशवे

बाळाजी विश्वनाथानें, "महाराजांची सेवा निष्ठेनें करून, मर्द व शहाणें राज्यांत मनुष्य नाना, ऐसा लौकिक वाढवून, महाराजांची कृपा संपादून प्रधानपद मिळविलें. अतिशय श्रम करून शत्रु पराभवातें पाववून महाराजांच्या राज्याचा बंदोबस्त केला."

शाहू महाराजांचा पक्ष उचलून धरला. हीच बाळाजीपंत नानाची मोठी कामगिरी होय. त्यानें मराठमंडळास मुलुखगिरीस नवें क्षेत्र

उत्पन्न करून दिलें. हिंदुपदपादशाहीचा पाया भक्कम केला आणि वसुलाची व्यवस्था पद्धतशीर ठरविली. बाळाजीपंत मुत्सद्दी होता. शाहू महाराजांची बाजू उचलून धरण्यांत त्यानें विशेष करामत व धैर्य दाखविलें. त्या वेळच्या मंडळींच्या मानानें बाळाजी विश्वनाथ विशेष लायक होता. म्हणूनच त्यास शाहू महाराजांनीं पेशवा केलें आणि तो पेशवे पदाला सर्वथैव लायक होता. कारण त्यानें अल्पसंख्य मराठ्यां-कडून बलवान् मोगलांस कबजांत आणिलें. मोगल बादशाहांनीं भेद-नीतीचा प्रयोग चालविला होता तो हाणून पाडला. आपसांत लढून नाश पावणाऱ्या मराठ्यांना उद्योगाला बाहेर क्षेत्र देऊन त्यांचें तेज वाढविलें. घरोघर सेनानायक उत्पन्न केले, देशभर नवीन नवीन शहरें उभारलीं. तो स्वतः दिल्लीवर चालून गेला. कोल्हापूरकर संभाजी व निजाम यांना त्यानें नमविलें. राजपूत, जाठ, बुंदेले, शीख यांचा धर्माभिमान त्यानें जागा केला. मराठयांच्या पराक्रमामुळें त्यानें हिंदुराष्ट्राचें संघटन घडवून आणलें. अशा या बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या स्मृतीला आपण वंदन करूं या.

समाप्त

अनुक्रम 75573
विषय
क्र. कि. 619
नों. दि. 20/3/92
IRBK-0105776

ग्रं. सं. ठाणे
विषय
नं.

